आ.क्र.१६३

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : ३०/०५/२०२३

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

केंद्र शासनाच्या मिशन लाईफ ( Life Style for Environment ) तसेच महाराष्ट्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान व माझी वसुंधरा अभियान ४.० या उपक्रमा अंतर्गत मा. आयुक्त अजीज शेख, मा. अति. आयुक्त, डॉ. करूणा जुईकर, मा. अति. आयुक्त, जमीर लेंगरेकर, व मा. उपायुक्त डॉ. सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली उल्हासनगर महानगरपालिकेच्या पर्यावरण विभाग तसेच सार्व. आरोगय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ३०, मे २०२३ रोजी पर्यावरण जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर जनजागृती रॅली सकाळी १०.०० वा. नेहरु चौक येथुन सुरु करुन हिरा मॅरेज हॉलमार्गे, टेलिफोन एकसचेंज कडुन उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालय येथे समाप्त करण्यात आली. जनजागृती रॅलीद्वारे प्लास्टीक बंदी, कच-याचे वर्गीकरण तसेच पर्यावरण जनजागृतीबाबत नागरीकांना आवाहन करण्यात आले.
सदर जनजागृती रॅलीमध्ये सार्व. आरोगय विभागाचे सफाई कर्मचारी तसेच वृक्ष फाऊंडेशन, सखी फाऊंडेशन, सोहम फाऊंडेशन इत्यादी अशासकिय संस्थाचे प्रतिनिधीदेखील सहभागी झाले होते.

सदर कार्यक्रमाचे आयोजन पर्यावरण विभागाच्या विभागप्रमुख सौ. विशाखा सावंत व सार्व. आरोगय विभागाचे सहा. सार्व. आरोगय अधिकारी, श्री. मनिष हिवरे, श्री. एकनाथ पवार तसेच श्री. विनोद केणी यांचेमार्फत करण्यात आले. सदर जनजागृती रॅलीमध्ये भांडार विभाग प्रमुख श्री. अंकुश कदम, जनसंपर्क अधिकारी श्रीम. छाया डांगळे व इतर अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

30/5/23

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.